# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

गणेशखिंड, पुणे - ४११००७

# Savitribai Phule Pune University

Ganeshkhind, Pune - 411007

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक: ०२०-२५६२१२२६
Telephone No.: 020-25621226
ईमेल/ Email:pgadmis@pun.unipune.ac.in

शैक्षणिक प्रवेश विभाग
P.G. Admission Section
Website: www.unipune.ac.in


## परिपत्रक क्र. ३२७/२०२४

**विषय:** पीएच्.डी. प्रवेश प्रक्रिया २०२४-२५ मुलाखत (Interview) प्रक्रिया सुरू करणेबाबत ..

**संदर्भ:**
1. विद्यापीठाचे परिपत्रक क्र. १५४/२०२४ (संदर्भ क्र. शै. प्रवेश/२१०४) दिनांक: ०९/०७/२०२४
2. विद्यापीठाचे परिपत्रक क्र. १७९/२०२४ (संदर्भ क्र. शै. प्रवेश/२४३६) दिनांक: ०७/०८/२०२४
3. विद्यापीठाचे परिपत्रक क्र. २६२/२०२४ (संदर्भ क्र. शै. प्रवेश/३४५३) दिनांक: २५/१०/२०२४
4. विद्यापीठाचे परिपत्रक क्र. २७६/२०२४ (संदर्भ क्र. शै. प्रवेश/३६६३) दिनांक: ११/११/२०२४
5. विद्यापीठाचे परिपत्रक क्र. २८२/२०२४ (संदर्भ क्र. शै. प्रवेश/३७३८) दिनांक: २३/११/२०२४

दि. ३१ ऑगस्ट, २०२४ रोजी विविध परीक्षा केंद्रावर पीएच्.डी. प्रवेश परीक्षा (पेट) आयोजित करण्यात आली होती. सदर परीक्षेचा निकाल दि. १२ सप्टेबर, २०२४ रोजी जाहीर करण्यात आला आहे. दिनांक २१ ऑगस्ट, २०२४ ते ०५ सप्टेंबर, २०२४ दरम्यान झालेल्या नेट परीक्षेत पात्र झालेले परंतु पेट परीक्षेत अपात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांकडून दि. २५ ऑक्टोबर, २०२४ ते ०५ नोव्हेंबर, २०२४ या कालावधीत अर्ज मागवून त्यातील पात्र अर्जदारांचा समावेश या प्रक्रियेमध्ये करण्यात आला. तद्नंतर दि. ११ नोव्हेंबर, २०२४ ते दि. ३० नोव्हेंबर, २०२४ या कालावधीत विद्यार्थ्यांना संशोधन केंद्र निवडण्याचा पर्याय उपलब्ध करून देण्यात आला होता.

दरम्यानच्या काळात पीएच्.डी. नियमावली, पीएच्.डी. ट्रॅकींग, पीएच्.डी. प्रवेशाबाबतची विकसित करण्यात आलेली नवीन संगणक प्रणाली, प्रबंध मूल्यमापनासाठी बहि:स्थ परीक्षक नेमणूक प्रक्रिया, इ. बाबतीत संशोधन केंद्रातील संशोधन केंद्रप्रमुख, संशोधन मार्गदर्शक, समन्वयक, व पीएच्.डी. संबंधित काम पाहणारे कर्मचारी यांच्यासाठी पुणे शहर, पुणे ग्रामीण, अहिल्यानगर, नाशिक व विद्यापीठ परिसरात कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या होत्या.

त्यास अनुसरून मा. विभागप्रमुख/ मा.प्राचार्य/ मा.संचालक, सर्व शैक्षणिक विभाग/ सर्व मान्यताप्राप्त महाविद्यालये/सर्व मान्यताप्राप्त संस्था, प्रस्तुत विद्यापीठ यांना कळविण्यात येते की, विद्यार्थ्यांची यादी व विभागीय संशोधन समितीमधील मा. कुलगुरू नामनिर्देशित दोन प्रतिनिधी (सर्वसाधारण व मागासवर्गीय) यांची नावे महाविद्यालय/विद्यापीठ विभाग यांच्या BoD Login मध्ये उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत. त्यानुसार, सर्व संशोधन केंद्रांनी दि. ३१ जानेवारी २०२५ पर्यंत मुलाखत प्रक्रिया पूर्ण करून त्याचा अहवाल पीएच्.डी. ट्रॅकींग प्रणालीवर ऑनलाईन पद्धतीने जमा करावा.

**मुलाखत प्रक्रिया पूर्ण करताना खालील सूचनांचे पालन करावे.**

१. प्रवेशासाठी संबंधित मार्गदर्शकांकडे मान्य असलेल्या प्रवेशक्षमतेनुसार आरक्षण न ठरविता संबंधित विद्यापीठ विभाग व महाविद्यालयामधील संशोधन केंद्र येथे त्या त्या विषयासाठी कार्यरत असलेल्या मार्गदर्शकांकडे मान्य असलेली प्रवेशक्षमता एकत्रित विचारात घेऊन आरक्षण ठरविण्यात आलेले आहे.

२. अभ्यासक्रम प्रवेशासाठी आरक्षणासंदर्भात शासनाने निर्गमित केलेल्या शासन निर्णयाचे काटेकोरपणे पालन करावे.

३. प्रवर्गनिहाय एकूण आरक्षणाच्या टक्केवारीनुसार आरक्षणाची अंमलबजाबणी करावी.

(OPEN-30%, EWS-10%, SC-13%, ST-7%, DT/NT-11%, OBC-19%, SBC-UPTO- 2% from OBC category if BOC quota not fulfilled, SEBC-10%) तसेच अनाथ 1% व दिव्यांगांसाठी 5%, समांतर आरक्षणाप्रमाणे शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील तरतुदी विचारात घेउन प्रक्रिया पूर्ण करावी.

४. सद्यस्थितीत पीएच.डी. संशोधक मार्गदर्शकाकडे कार्यरत असलेल्या प्रवर्गाचे विद्यार्थी विचारात घेऊन प्राधान्याने इतर प्रवर्गाचे विद्यार्थी विहित नियमानुसार द्यावेत.

५. आरक्षणानुसारच आरक्षित जागांवर त्या त्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांची निवड करावी तसेच आरक्षणामध्ये अदलाबदल करण्यात येऊ नये.

६. सर्व मान्यताप्राप्त संशोधन केंद्रांना विभागाच्या/महाविद्यालयाच्या BoD Login मध्ये संबंधित संशोधन केंद्र निवडलेल्या विद्यार्थ्यांची अद्यावयत यादी उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यानुसार सदर यादीतील विद्यार्थ्यांना संशोधन केंद्रांनी त्याच्या स्तरावर ई-मेल व दूरध्वनीद्वारे तसेच संशोधन केंद्र महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर मुलाखतीच्या वेळापत्रकाबाबत माहिती प्रसिद्ध करावी.

७. विभागीय संशोधन समितीमधील दोन विषय तज्ज्ञ व अध्यक्षांनी मुलाखतीसाठी द्यावयाचे गुणदान ऑनलाईन पद्धतीने करावे. त्यानंतर मुलाखतीचे गुण पीएच्.डी. ट्रॅकींग प्रणालीवर प्राप्त झाल्यानंतर पेट परीक्षेचे गुण/पेट परीक्षेतून सूट मिळालेल्या विद्यार्थ्यांचे गुण व मुलाखतीचे गुण यांचे एकत्रीकरण करून प्रणालीमार्फत गुणवत्ता यादी (Merit List) BoD Login मध्ये उपलब्ध होईल.

८. मुलाखत प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर BoD Login मध्ये Cosolidated Reprot व Selection Report डाऊनलोड करून सर्व सदस्य व अध्यक्षांच्या स्वाक्षरीसह अहवाल पीएच्.डी. ट्रॅकींग प्रणालीवर अपलोड करावेत. **सदर अहवालांची किंवा इतर कागदपत्रांची छापील प्रत शैक्षणिक प्रवेश विभागाकडे जमा करू नये.**

९. संशोधक मार्गदर्शकांकडे विद्यार्थी वर्ग करताना विद्यापीठाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या संशोधक मार्गदर्शकांसाठीच्या सूचनांचे तंतोतंत पालन करावे तसेच संशोधक विद्यार्थी व संशोधन मार्गदर्शक यांची विषय विशेषता (specialization) लक्षात घेऊन समन्वयाने संशोधन मार्गदर्शकांची नियुक्ती करावी.

१०. संशोधन केंद्रांनी निवड केलेल्या उमेदवाराची शैक्षणिक पात्रता तपासून ते प्रवेशासाठी पूर्णपणे पात्र असल्याची खात्री करावी.

a) Marks Statement of Post Graduation. (Minimum 55% marks for open category & 50% marks for reserve category)
b) Result of PET Entrance Examination 2024.

किंवा

UGC-NET (Including JRF) / UGC-CSIR NET (Including JRF) /SET / GATE (valid score), GPAT (valid score) Certificate and other similar Certificates for exemption as notified in the notification.

११. मागासवर्गीय प्रवर्गातील अर्जदारांचे खालील कागदपत्रे तपासावीत.

a) Caste Certificate
b) Non Creamy Layer for other than SC, ST & EWS.
c) EWS Certificate for EWS
d) UDID Certificate along other necessary documents for Divyang Student.

१२. विभागीय संशोधन समिती सदस्यांकडून मुलाखतीस रक्त नात्यातील कोणीही नातेवाईक नसल्याबाबत हमीपत्र संबंधित संशोधन केंद्राने भरून घ्यावे.

१३. वरील प्रक्रिया सुलभ होण्यासाठी User Manual संशोधन केंद्रांच्या Login मध्ये उपलब्ध करून देण्यात आले आहे.

सदर प्रक्रिया पूर्ण करताना कांही तांत्रिक अडचण आल्यास, प्रशासकीय भवन, पहिला मजला येथील आय. टी. सपोर्ट संपर्क क्र. ०२०-७१५३३६३३ अथवा phdtracking_support@pun.unipune.ac.in या ईमेलवर संपर्क साधावा.

गणेशखिंड, पुणे ४११००७ )
संदर्भ: शै.प्रवेश/ ४१६४ )
दिनांक: ३१/१२/२०२४ )

(डॉ. मुंजाजी रासवे)
उपकुलसचिव

1. मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.
2. मा.प्राचार्य/मा.संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था, प्रस्तुत विद्यापीठ.

D:\PET 2024\Circulars docx